**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र. ३११६ दि. २८ /०९ /२०१९**

**मुंढवा पोलीस ठाणे,पुणे शहर.**

**पोलीस काका उपक्रमाअंतर्गत घोरपडी भागातील हायस्कुलमधील लहान मुलांना केले मार्गदर्शन**

पुणे पोलीस आयुक्तालयाचा जिव्हाळयाचा विषय असलेल्या पोलीस काका, उपक्रम प्रभावीपणे राबवुन शाळा, महाविद्यालय, हायस्कुलमध्ये शिक्षण घेणाया लहान मुलांच्या मनामध्ये पोलीसाबद्दल आपुलकीची भावना निर्माण होवून व शाळा, महाविद्यालयीन शिक्षण घेणाया मुला, मुलींनी त्यांच्या अडचणी प्रभावीपणे पोलीसांसमोर मांडाव्यात याअनुषंगाने पोलीस काका हा उपक्रम राबविणेबाबत मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी वेळोवेळी दिलेल्या सुचना देण्यात आलेल्या आहेत.

त्याअनुषंगाने मुंढवा पोलीस ठाणे कडील पोलीस काका पोलीस हवालदार शेख, पोलीस नाईक गवळी यांनी धोंडीबा जाधव आदर्श विद्यालय, घोरपडी, भागतसिंग प्राथमिक शाळा, घोरपडी या स्कुलमध्ये कार्यक्रम आयोजीत करुन, २०० ते २५० विद्यार्थी/विद्यार्थीनींना ‘पोलीस काका’ या संकल्पनेबाबत माहिती देवून, विद्यार्थ्यांशी शिक्षण, सुरक्षा, सामाजीक बांधीलकी, जबाबदारी, जेष्ठ नागरीक, पालक यांचेशी वर्तनुक, मोबाईलचे दष्परीनाम, वाईट सवई, व्यसनाधिनता या व अशा विविध विषयावर चर्चा करण्यात आली.

तसेच लहान मुलांना स्वतःची सुरक्षा, चांगल्या, वाईट प्रवृत्ती, गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोकांबाबत माहिती देवून, अनोळखी व्यक्तीशी बोलणे व आपात्कालीन परिस्थिती ओढवलेस काय उपाययोजना कराव्यात याबाबत मार्गदर्शन केले

सदर चर्चेस मुलांनीही उस्पुर्तपणे प्रतिसाद दिल्याने व सदर कार्यक्रमास उपस्थित असलेले शाळेचे मुख्याध्यापक व इतर शिक्षक, शिक्षीका यांनीही अशा आभार व्यक्त करुन व पोलीस काकांनीही लहान मुले तथा शिक्षकाना शाळेमध्ये काही अडचण निर्माण झालेस तात्काळ पोलीस काकांना फोन करणेबाबत सुचित केले व त्याप्रमाणे नमूद शाळांमध्ये पोलीस काकांचे फोन नंबर व माहितीचे बोर्ड शाळेच्या दर्शनी भागावर लावण्यात आले.

